सातारा नगरपरिषद सातारा
सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा ४१५००१
दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३४०७६/२३४०७७
Email - sataramunicipal@gmail.com

जा.क्र/सानप/साबां/१७८१
सातारा नगरपरिषद,सातारा
दिनांक- ०९/०७/२०२४

## ई निविदा सुचना क्र. २१ सन २०२३ - २०२४ (ऑनलाईन) निविदा

मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा ४१५००१ (दुरध्वनी क्रमांक २३४०७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन तसेच शासकीय/निमशासकीय कामाचा अनुभव असलेल्या मक्तेदाराकडून खालील कामाकरीता नमुन्यातील निवीदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

| काम क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. | निविदेसोबत भरावयाची इसारा/ बयाणा रक्कम | करारनामा सोबत भरावयाची सुरक्षा अनामत | काम पुर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग | ई निवीदा संचाची किंमत रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैशिष्ट्यपुर्ण योजनेअंतर्गत शासन निर्णय क्रमांक नपावै - २०२३/प्र. क्र. ५७५ (६)/नवि - १६ दि. १०/०८/२०२३ प्रमाणे सातारा शहरातील विविध कामे करणे. | ३,३९,३९,१३४/- | ३,३९,३९१/- | ३,३९,३९१/- | ३०० दिवस | अर्हता प्राप्त | २०००/- +१८% GST = २३६०/- |

### ई-निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा कालावधी (निविदा विक्री) | दि.१० /०७ /२०२४ |
| २ | निविदाकारांनी ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक (तांत्रिक व आर्थिक निविदा दिनांक व वेळ) | दि१७ /०७ /२०२४ रोजी वेळ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत |
| ३ | तांत्रिक आणि आर्थिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | मा. मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद यांचे कार्यालयात दि.१९ /०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० नंतर ऑनलाईन निविदा उघडण्यात येतील (शक्य झाल्यास) |

१) सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या Main Portal- http://mahatenders.gov.in व याच http://mahatenders.gov.in साईटवर enrolled करणे आवश्यक आहे.

२) निविदाकारांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही
शंका/अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा टोल फ्री नंबर- (२४x७) १८००३०७०२२३२

३) निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

४) इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकारी नगरपरिषदेने राखुन ठेवलेले आहेत.

५) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायदा १९५२ अन्वये कंत्राटदारास कर्मचारी भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे असे न केल्यास संबंधित मक्तेदाराने भरलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.

६) निविदा भरल्यानंतर सदर निविदाबाबत मी काम करु शकणार नाही अशा प्रकारचे मक्तेदाराने पत्र व्यवहार केले तर त्या मक्तेदाराचे ऑनलाईन भरलेली बयाणा रक्कम जप्त करणेत येईल व काळ्या यादीत नाव नोंदणेसाठी कार्यवाही करणेत येईल.

७) मक्तेदाराने ज्या कामासाठी ऑनलाईन पैसे भरलेले आहेत त्या बयाणा रक्कमेच्या पावतीवर कामाचे नाव त्याचे अथवा पार्टनरशिप फर्मचे नाव सही व शिक्का करुन ती पावती ऑनलाईन upload करावी.

८) मक्तेदार वस्तु व सेवा कर कार्यालयाकडे (GST) नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. निविदेसोबत वस्तु व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

९) वरील कामांच्या दरामध्ये वस्तु व सेवा कराचा (GST) समावेश नाही. मक्तेदार यांचे देयकामध्ये प्रचलित दराने वस्तु व सेवा कर अदा करणेत येईल. त्यामुळे मक्तेदारांनी वस्तू व सेवा कर वगळून निविदा दर भरावेत.

१०) मक्तेदारास कार्यादेश दिल्यानंतर काम सुरु करण्यापूर्वीचे व काम सुरु असतानाचे व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो स्वखर्चाने सादर करणे आवश्यक आहे.

११) मंजुर निविदा धारकाचे देयकातुन सुरक्षा अनामत ८% प्रमाणे कपात करणेत येईल व निविदेसोबत भरणेत आलेली बयाणा व करारनामा करताना भरलेली सुरक्षा अनामत अशी एकूण १०% रक्कम सुरक्षा अनामत कपात करणेत येईल. डांबरीकरणाची कामे पूर्ण झाल्यापासून ३ वर्षानंतर कामाची पाहणी करुन सुरक्षा अनामत अदा करणेत येईल. सदरच्या कामाचा दोष निवारण कालावधी (Defect Libility Period) तिन वर्षांचा असून या कालावधीमध्ये कामामध्ये काही दोष आढळून आल्यास मक्तेदाराने तो स्वखर्चाने दुरुस्त करुन देणेचा आहे.

मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद, सातारा